# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजना आणि आष्टी उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारची मंजुरी
- मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी ८० हजार कोटीचा प्रकल्प राबवणार, मुख्यमंत्र्यांची घोषणा
- उदगीर ते देगलूर आणि आदमपूर फाटा ते सगरोळी फाटा मार्गाच्या ८०९ कोटी ७७ लाख रुपयांच्या कामांना केंद्र सरकारची मंजुरी
- दिवाळीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित भाडेवाढ मागे घेण्याचा एसटी महामंडळाचा निर्णय

आणि

- प्रसिद्ध अभिनेते अतुल परचुरे यांचं निधन, आज मुंबईत अंत्यसंस्कार

****

दमणगंगा – एकदरे गोदावरी नदी जोड योजना राबवण्यास राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल ही बैठक झाली. मराठवाड्यात गोदावरी खोऱ्यात पाण्याची तूट भरून काढण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याची प्रतिक्रिया खासदार अशोक चव्हाण यांनी दिली. आष्टी उपसा सिंचन योजना, तसंच वैजापूर नजिक शनीदेवगाव बंधाऱ्याच्या कामांनाही राज्य मंमंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही मार्गांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण पथकर माफी करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला असून, या निर्णयाची मध्यरात्रीपासून अंमलबजावणी सुरु झाली आहे. यासंदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले,

***"या मुंबई एन्ट्री पॉइंटमध्ये नाक्यावर होणारी गर्दी, वाहतूक कोंडी, यामुळे टोल मधून सूट मिळावी अशी मागणी होती. मला समाधान आहे, आनंद आहे, जे लाखो आपल्या प्रायवेट कार ने प्रवास करणारे लोक जे आहेत, त्याच्यामध्ये मध्यमवर्गीयही आहेत, आणि या सर्व लोकांना, लाखो लोकांना दिलासा या टोल माफीमुळे मिळणार आहे."***

मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करणं, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी तसंच उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करणं आणि कौशल्य विद्यापीठाचं पद्मविभूषण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ असं नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना शहरीचा दुसरा टप्पा राबवणं, आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करणं, राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करणं, खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणं, किल्लारी शेतकरी सहकारी कारखान्याला व्याजासह कर्जमाफी, तसंच अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचं थकीत कर्ज माफ करण्यासही राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

****

मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी ८० हजार कोटीचा प्रकल्प राबवणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. जालना जिल्ह्यात घनसावंगी तालुक्यातल्या कुंभारपिंपळगाव इथं आयोजित शेतकरी मेळाव्यात ते काल बोलत होते. मराठवाड्यामध्ये जे आवश्यक आहे, त्या बाबी करून नदीजोड प्रकल्पच्या माध्यमातून समुद्रात वाया जाणारं पाणी वळवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. याबरोबरच सरकार राज्यातल्या शेतकऱ्यांना कधीच वाऱ्यावर सोडणार नाही, शेतकऱ्यांना १२ हजार रुपये देणारं महाराष्ट्रातलं महायुतीचं सरकार, हे देशातलं पहिलं सरकार ठरलं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. जालना जिल्हा अतिवृष्टी अनुदानातून वगळण्यात येणार नाही, असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार संदिपान भुमरे, उद्योगमंत्री उदय सामंत, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, माजी मंत्री अर्जुन खोतकर, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. ब्ल्यू सफायर कंपनीच्या अन्नप्रक्रिया उद्योगाच्या दुसऱ्या युनिटचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झालं. हिकमत उढाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या कार्यक्रमात शिवसेनेत प्रवेश केला.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवू, या प्रकरणातल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, सिद्दिकी हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या दोघांपैकी धर्मराज कश्यप हा आरोपी अल्पवयीन नसल्याचं चाचणीतून सिद्ध झाल्यामुळे त्याला २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. तर या प्रकरणातला आणखी एक आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबई पोलिसांनी काल पुण्यातून अटक केली.

****

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या विजेत्या शाळांना काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह आणि धनादेश देऊन सन्मानित करण्यात आलं. जालना जिल्ह्यात जवखेडा खुर्द इथल्या दशरथ बाबा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयानं, राज्यस्तरीय तिसरा क्रमांक पटकावला, तर छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभागात उत्कृष्ट काम केलेल्या शाळांना विभागीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.

****

राष्ट्रीय महामार्ग-६३ वर उदगीर ते देगलूर आणि आदमपूर फाटा ते सगरोळी फाटा मार्गाच्या, ८०९ कोटी ७७ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून ही माहिती दिली. या मार्गामुळे उदगीर, मुक्रमाबाद आणि देगलूर शहरातल्या औद्योगिक कृषी-व्यावसायिक उपक्रमांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

****

दिवाळीत प्रवाशांच्या होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित भाडेवाढ मागे घेण्याचा निर्णय एसटी महामंडळानं घेतला आहे. २५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान ही भाडेवाढ होणार होती. यासंदर्भातलं पत्रक शुक्रवारी महामंडळानं प्रसिद्ध केलं होतं. हे पत्रक मागे घेत असल्याचं एसटी महामंडळानं काल जाहीर केलं.

****

प्रसिद्ध अभिनेते अतुल परचुरे यांचं काल मुंबईत निधन झालं, ते ५७ वर्षांचे होते. काही काळापूर्वी कर्करोगाशी सामना करुन ते त्यातून यशस्वीपणे बाहेर पडले होते. मात्र अचानक त्रास सुरू झाल्यानं त्यांना काही दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल

करण्यात आलं होतं. विनोदी अभिनेता म्हणून प्रसिद्ध झालेल्या अतुल परचुरेंनी बालरंगभूमीपासूनच अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. रंगभूमीबरोबरच छोट्या आणि मोठ्या पडद्यावरही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. मराठी – हिंदी मिळून त्यांनी ४० पेक्षा जास्त चित्रपटात काम केलं. तरुण तुर्क म्हातारे अर्क, वासूची सासू, प्रियतमा, या नाटकातल्या त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. नवरा माझा नवसाचा, नारबाची वाडी, बुड्ढा होगा तेरा बाप हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट. त्यांच्या निधनामुळे मराठी हिंदी चित्रपट आणि नाट्यसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परचुरे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. परचुरे यांच्या पार्थिवावर आज मुंबईत अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

परळी वैजनाथ इथं क्रीडा संकुल उभारण्यासाठी जलालपूर इथली पाच हेक्टर ३० आर जागा मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय ऊर्जा विभागाने घेतला आहे. याबाबातचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला. ही जमीन क्रीडा विभागास हस्तांतरित करून क्रीडा संकूल उभारणीबाबतची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निर्देश पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

****

आपण निवडून आलो तरी आपला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला कायम विरोध राहिल, असं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांवर त्यांनी यावेळी टीका केली. अदिवासी आणि ओ बी सी समाजाची एकत्रित मोट आम्ही बांधत असून, एक दोन दिवसात हे कार्य शंभर टक्के पूर्ण होईल नंतर आम्ही आमची भूमिका स्पष्ट करणार असल्याचं, आंबेडकर यांनी नमूद केलं.

****

जालना शहरातल्या चंदनझिरा भागात नऊ वर्षीय मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ काल रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. यामुळे जालना–छत्रपती संभाजीनगर मार्गावरची वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी सहा संशयितांना ताब्यात घेतलं आहे. या मुलीला गुंगीचं औषध देऊन लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार रविवारी रात्री समोर आला. पीडित मुलीवर छत्रपती संभाजीनगर इथल्या घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

****

नांदेड इथं काल जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकरी आसूड मोर्चा काढण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांच्या नेतृत्वात निघालेल्या या मोर्चात सोयाबीनला प्रति क्विंटल साडे आठ हजार रुपये तर कापसाला ११ हजार रुपये दर द्यावा, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित द्यावी, नदीकाठच्या शेतकऱ्यांना दुहेरी अनुदान देण्यात यावं, शेतकऱ्यांचं कर्ज शंभर टक्के माफ करावं आदी मागण्या करण्यात आल्या.

****

आगामी फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यक ऋषीकेश कांबळे यांची सर्वानुमते निवड झाली आहे. थायलंड इथल्या पटाया इंडियन असोसिएशन या संस्थेच्या भारतीय वंशाच्या सदस्यांच्या मदतीने येत्या पाच जानेवारी २०२५ रोजी बॅकॉक इथं हे संमेलन होणार आहे.

****

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातले जवळपास ८०० ज्येष्ठ नागरिक लातूर इथून रेल्वेने अयोध्या धामला रवाना झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या यात्रेला सुरुवात करण्यात आली. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी तीर्थ दर्शन यात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशाचं यावेळी वाचन करण्यात आलं.

****

परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत असलेले चार आधार नोंदणी केंद्र काल जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. आधार नोंदणी आणि दुरुस्तीसाठी या केंद्राचा नागरिकांनी लाभ घ्यावा असं आवाहन गावडे यांनी यावेळी केलं.

****

महिलांच्या टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे. अ गटात काल झालेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने पाकिस्तानचा पराभव करत उपान्त्य फेरीत प्रवेश केला. भारतीय संघ चार गुणांसह तिसर्या स्थानावर राहीला. ऑस्ट्रेलिया पहिल्या तर पाकिस्तान चौथ्या स्थानावर आहे.

****